# प्रेस नोट ता. १४/०९/२०२०

## सांगवी खुन प्रकरण

## गुन्हे शाखा युनिट- ४, पिंपरी चिंचवड

## कडुन मुख्य आरोपीस २४ तासाच्या आत अटक व गुन्हा उघड

सदर प्रकरणाची हकिगत अशी की, दि. १३/०९/२०२० रोजी सांगवी पोलीस ठाणे हद्दित औंध हॉस्पिटल कॅम्पच्या आवारत आरोपी नामे आयाज शेख, रा-शिवाजीनगर याने त्याच्या पत्नीचे मयत नामे सौरभ व्यंकट जाधव, वय-२८ वर्षे, रा- दापोडी याच्याशी लग्नापुर्वी असलेले प्रेमसंबंधाचा राग मनात धरुन त्याचा साथिदार नामे सोन्या बाराथे, रा- दापोडी याच्या सह मिळुन सौरभ याच्यावर धारधार कोयत्याने वार करुन त्यास जिवे ठार मारले म्हणुन सांगवी पोलीस ठाणे येथे गु.र.नंबर-३७८/२०२० भा.दं.वि.कलम ३०२, ३४ प्रमाणे दाखल होता.

सदरचा प्रकार हा औंध हॉस्पिटलचे आवारात दिवसाढवळया झालेला असल्याने व त्यामुळे परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाल्याने याबाबत मा.पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांनी गंभीर दखल घेवुन याबाबत गुन्हे शाखा युनिट-४ यांना समांतर तपास करुन ताबडतोब सर्व आरोपी अटक करण्याचे आदेश दिले होते.

त्यानुसार मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मोहन शिंदे, गुन्हे शाखा युनिट-४ यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख आणि स्टाफने गुन्हा दाखल होताच समांतर तपास सुरू केला. तेव्हा खुन करते वेळी आयाज सह सोन्या बाराथे व्यतिरिक्त आणखी ०४ आरोपी असल्याचे माहिती प्राप्त झाली. त्यानुसार सदर आरोपींचा त्यांचे सर्व नातेवाईक मित्रांकडे तपास करत असताना माहिती मिळाली की, सदर गुन्हयातील मुख्य आरोपी आयाज हा त्याचे साथिदारा सह वडगाव मावळ परिसरात त्याचे एका मित्रा कडे लपुन बसलेला असुन तो कोठे तरी लांब पळुन जाण्याच्या तयारीत आहे. मिळालेल्या माहितीच्या अनुशंगाने सपोनि देशमुख यांनी स्टाफसह सदर परिसरात शोध घेवुन आरोपी लपुन बसल्याचे ठिकाण शोधुन काढले. सदर ठिकाणी सापळा रचुन आरोपी नामे आयाज शेख हा त्याचा गुन्हयातील साथिदार नामे नयन ऊर्फ तांडया लोंढे, याचे सह पळुन जाण्याच्या तयारीत असताना पाठलाग करुन शिताफीने ताब्यात घेतले.

सदर आरोपींना ताब्यात घेतलेवर मुख्य आरोपी नामे १) आयाज नुरमोहम्मद शेख, वय-२५ वर्षे, रा- गल्ली नंबर-८ ,पाटील इस्टेट, शिवाजी नगर, पुणे याने त्याचा साथिदार नामे २)नयन विजय लोंढे, वय- १९ वर्षे, रा- लोंढे वस्ती, शिवाजी पुतळयाच्या जवळ, दापोडी, पुणे. ३) सोन्या बाराथे, व इतर ०३ साथिदारांसह मिळुन सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे.तरी गुन्हे शाखा युनिट-४ चे अधिकारी व कर्मचारी यांनी धडाडीने व कसुन तपास करुन गुन्हा दाखल झाल्या पासुन २४ तासाच्या आत मुख्य आरोपीस त्याचे साथिदारासह अटक करुन गुन्हा उघडकिस आणला आहे. सदर आरोपींना पुढील कारवाई कामी सांगवी पोलीस ठाणे यांच्या ताब्यात दिले असुन पुढील तपास सांगवी पोलीस ठाणे करत आहे. तसेच इतर आरोपींचा शोध सुरु आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. कृष्ण प्रकाश, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त मा. श्री. राजाराम पाटील गुन्हे यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहन दा. शिंदे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, पोहवा/ प्रविण दळे, नारायण जाधव, संजय गवारे, धर्मराज आवटे, दादाभाऊ पवार,

अदिनाथ मिसाळ पोना/ संतोष असवले, तुषार शेटे, लक्ष्मण आढारी, मो. गौस नदाफ, वासुदेव मुंडे पोशि/ शावरसिध्द पांढरे, प्रशांत सैद, सुनिल गुट्टे, तुषार काळे, सुरेश जायभाये, अजिनाथ ओंबासे, धनाजी शिंदे, सुखदेव गावंडे, गोंविद चव्हाण, अतुल लोखंडे व नागेश माळी, राजेंद्र शेटे तांत्रिक विश्लेषन विभाग गुन्हे शाखा यांनी केली आहे.

